लोकसत्ता पु पान नं. ४

# घेराव घालण्याचा इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई :** परिवहन विभागाने मीटर बदल न करून घेतलेल्या रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय हा अन्यायकारक आहे. पालघर जिल्ह्यात मोठ्या संख्येने रिक्षा आहेत आतापर्यंत केवळ दोन हजार रिक्षांचे मीटर बदल करून झाले आहेत. त्यामुळे आयुक्तांनी हा निर्णय मागे घ्यावा व मुदतवाढ द्यावी. जर यावर तोडगा निघाला नाही तर मंत्रालयात जाऊन परिवहन आयुक्तांना घेराव घालून आंदोलन करू, असा इशारा रिक्षा चालक-मालक महासंघातर्फे देण्यात आला आहे.

एरवी रिक्षांनी गजबजलेले वसई, नालासोपारा, विरार स्थानकाजवळील व इतर विविध ठिकाणचे रिक्षा थांबे बुधवारी सर्वत्र ओसाड असल्याचे दिसून आले आहे. दरम्यान शहरातील रिक्षा बंद असल्याने सर्वसामान्य नागरिकांना कामाच्या ठिकाणी वेळेत पोहोचता येत नसल्याने हाल झाले आहेत. शासनाने रिक्षाचालकांच्या ज्या मागण्या असतील त्या पूर्ण करून प्रवासी वाहतूक सुरळीत करावी, अशी मागणी शरद जळगावकर या प्रवाशाने केली आहे.



" परिवहन विभागाकडून करण्यात येत असलेली दंडाची कारवाई अन्यायकारक आहे. यासाठी ही कारवाई रद्द करावी व आम्हाला मुदतवाढ मिळावी अशी आमची मागणी आहे.
- **विजय खेतले**, अध्यक्ष, रिक्षा चालक-मालक महासंघ

" परिवहन विभागाकडून करण्यात येत असलेली दंडाची कारवाई अन्यायकारक आहे. यासाठी ही कारवाई रद्द करावी व आम्हाला मुदत वाढ मिळावी अशी आमची मागणी आहे.
- **विजय खेतले**, अध्यक्ष रिक्षा चालक मालक महासंघ

पुढारी पु पान नं. ३

# सराईत तीन आरोपींना अटक; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**मीरा रोड :** पेल्हार पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी करणाऱ्या ३ आरोपींना पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली. या कारवाईत विविध गुन्हे उघडकीस आणून ५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक आरोपींपैकी राजेश कदम ऊर्फ घोचू, याच्यावर मुंबई, पालघर, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात एकूण १६ गुन्हे दाखल असून, आरोपी अजयन पाऊर विठ्ठू ऊर्फ पी. व्ही. याच्यावर तुळींज, वाकोला या पोलीस ठाण्यांमध्ये विविध कलमांखाली ३ गुन्हे दाखल आहेत.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत ५ जानेवारी रोजी नवजीवन सोसा., वसई (पु.) येथील मामुन हारुन पियाजी यांच्या दुकानाचे लॉक तोडुन दुकानातील विविध कंपन्याचे मोटर सायकलचे पार्टस, डी. व्ही. आर. टी.व्ही., टुल्स असा २ लाख ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरी केल्याबाबत अज्ञात आरोपीतांविरुद्ध पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे अनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास करून राजेश कदम ऊर्फ घोचु (रा. कांदिवली, मुंबई), अजयन पाऊर विठ्ठू ऊर्फ पी. व्ही (रा. नालासोपारा प.), हरिंद्र गुप्ता (रा. वांद्रे, मुंबई ) यास ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केल्यामुळे तिघांना अटक करण्यात आली आहे.

CamScanner

लोकसत्ता पु पान नं - ६

# नालासोपाऱ्यात कारखान्याला भीषण आग

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** नालासोपारा पूर्वेतील वाकणपाडा येथे रामा इंडस्ट्रीमधील 'एलईडी'चे उत्पादन घेणाऱ्या कारखान्याला बुधवारी दुपारी ११.४५ च्या सुमारास भीषण आग लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

वाकणपाडा येथील रामा इंडस्ट्री असून, यात अवधूत आश्रम येथे एलईडी व इलेक्ट्रॉनिक साहित्य तयार करण्याचा कारखाना आहे. बुधवारी दुपारी या कारखान्यात आग लागल्याने खळबळ उडाली होती. या आगीची माहिती स्थानिकांनी अग्निशमन दलाला दिली. ही माहिती मिळताच नालासोपारा, आचोळे, विरार येथील अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले. मात्र, लाकडी साहित्य अधिक प्रमाणात असल्याने आगीने अधिक पेट घेतला. अखेर दोन ते तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात जवानांना यश आले. या घटनेत जीवितहानी झालेली नाही. आगीचे कारण समजू शकलेले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली आहे.



# चोरीला गेलेला एक कोटीचा ऐवज नागरिकांना परत

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या चोरीच्या ५१ गुन्ह्यांतील एक कोटी आठ लाख रुपयांचा मुद्देमाल सोमवारी तक्रारदारांना परत करण्यात आला.

मीरा रोड येथील शहनाई हॉलमध्ये पोलीस आयुक्तालयाकडून मुद्देमाल परत करण्याच्या कार्यक्रमाचे सोमवारी आयोजन करण्यात आले होते. या वेळी पोलीस आयुक्त मधुकर पांडे आणि परिमंडळ १ चे उपायुक्त जयवंत बजबळे यांच्या हस्ते तक्रारदारांना मुद्देमाल देण्यात आला.

पोलिसांनी परत केलेल्या या मुद्देमालामध्ये तीन चारचाकी वाहने, तीन रिक्षा, आठ दुचाकी, १५ मोबाइल, सोने आणि रोख रकमेचा समावेश होता. साधारण वर्षभराच्या कालावधीनंतर मिळालेल्या आपल्या वस्तू परत घेताना अनेक नागरिक भावुक झाले असल्याचे दिसून आले.

**पोलीस ठाणेनिहाय परत केलेला ऐवज**

| पोलीस ठाणे | मुद्देमालाची किंमत (रुपयांत) |
|---|---|
| भाईंदर | ९,७२,७०० |
| नयानगर | ३०,००,५३५ |
| नवघर | २५,८८,११७ |
| उत्तन | ७,५०० |
| काशिमीरा | १६,३८,५०० |
| मीरा रोड | २९,९६,१३५ |

# काशीनगरमध्ये फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** भाईंदर पूर्व येथील काशीनगर परिसरात बाजार सोडून रस्त्यावर बसत असलेल्या फेरीवाल्यांवर मीरा-भाईंदर पालिकेकडून बुधवारी कारवाई करण्यात आली. यावेळी फेरीवाल्यांच्या हातगाड्या जप्त करण्यात आल्या.

मीरा-भाईंदर महापालिकेकडून शहरातील फेरीवाल्यांसाठी 'फेरीवाला धोरण' निश्चित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करून त्यांना फेरीवाला क्षेत्र निर्धारित करून दिली आहेत. मात्र तरीदेखील या नियमांचे उल्लंघन करत अनेक फेरीवाले हे 'ना-फेरीवाला' क्षेत्रात व्यवसाय करत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे वाहतूककोंडीत अधिक भर पडत असल्याची तक्रार महापालिका आणि वाहतूक विभागाकडे करण्यात येत होती. महापालिकेने अखेर बुधवारी बाजाराबाहेर उभे राहून व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई केली. त्यात फेरीवाल्यांच्या गाड्या व विक्रीमाल जप्त केल्याची माहिती पालिकेने दिली आहे. या कारवाईमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

CamScanner

लोकसत्ता पु पान नं - ७

# सायबर गुन्ह्यांत तिपटीने वाढ

## उच्चशिक्षितांची फसवणूक होण्याचे प्रमाण सर्वाधिक

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार आणि मीरा-भाईंदर शहरात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण २०२१च्या तुलनेत २०२२ मध्ये तिपटीने वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. सायबर कक्षाकडे २०२१ मध्ये केवळ ७९४ तर २०२२ मध्ये २,७३८ इतक्या तक्रारी आल्या. यात सर्वाधिक प्रमाण हे उच्चशिक्षितांचे आहे, अशी माहिती सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजीत गुंजकर यांनी दिली.

सर्वाधिक व्यवहार ऑनलाइन होऊ लागल्याने आर्थिक देवाणघेवाणीचे प्रमाण वाढले आहे. फसवणूक झालेल्यांमध्ये उच्चपदस्थ, डॉक्टर, वकील, बँकेत काम करणारे तसेच आयटी क्षेत्रातील कर्मचारी आहेत. माहितीचा अभाव आणि निष्काळजीपणामुळे त्यांची फसवणूक होत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### तपासनामा

**वर्ष २०२२**
२७ प्रकरणांचा छडा
९४ लाखांची रक्कम परत
७ लाख रुपये सर्वाधिक रकमेची फसवणूक

**सायबर जागृती**
२२ ठिकाणी प्रशिक्षण शिबिरे
१२ ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रम



### फसवणूक अशी

- नोकरी आणि बक्षिसाचे आमिष दाखवून ओटीपी मागवला जातो. वीज देयक थकल्याचे सांगून ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले जाते. ग्राहकाने ते केल्यास त्याच्या खात्यावरून पैसे लंपास.
- 'ओएलएक्स'सारख्या तत्सम वाणिज्यविषयक खरेदी विक्रीच्या संकेतस्थळावरून बनावट खाती तयार मुलींच्या नावाने फेसबुक वा व्हॉटसॲपवर संदेश पाठवून अश्लील संभाषण करण्यास भाग पाडले जाते आणि नंतर त्याच्या चित्रफिती तयार करून खंडणी उकळली जाते.

### फसवणूक झाल्यास...

हेल्पलाइन- १९३०
सायबर गुन्हे शाखा संपर्क- ०२२-२८११०१३५
व्हॉटसअप हेल्पलाइन- ९००४८८०१३५
संकेतस्थळ- cybercrime. mb- vv@mahapolice. gov. in

पुढारी पान नं - ४

# भाईंदरमध्ये स्मशानातील गॅसची चोरी

## मिरा-भाईंदरच्या तीन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पश्चिमेला असलेल्या पालिकेच्या स्मशानभूमीतील कर्मचारी हे गॅसदाहिनीसाठी पाठवलेले गॅस बाटले हे परस्पर लाटून आपल्या घरी वापरण्यासाठी नेत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पालिका आयुक्तांच्या आदेशानुसार कनिष्ठ अभियंता प्रशांत जानकर यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात तीन कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

भाईंदर पश्चिम येथील स्मशानभूमीत २०१९ पासून महापालिकेकडून गॅसवर शवाचे दहन करण्याची सुविधा सुरू केली आहे . त्यासाठी शेखर इलेक्ट्रिक कंपनी यांना ठेका दिला आहे. शेखर इलेक्ट्रिक कंपनी महापालिकेकडून नवकार गॅस एजन्सी यांच्याकडून एलपीजी गॅस सिलेंडर घेऊन प्रेत दहन करण्यासाठी त्याचा वापर करत आहे. हे गॅस सिलिंडर पालिका कर्मचारी बबन खुळे यांच्या ताब्यात देतात. पुरवठा करण्यात येणाऱ्या गॅसच्या देयकामध्ये वाढ झाल्याचे दिसून आल्याने त्याची चौकशी करण्यासाठी शहर अभियंता दीपक खांबीत यांनी चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार कनिष्ठ अभियंता प्रशांत जानकर यांनी चौकशी केली असता ११ जानेवारी रोजी त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी बबन खुळे, त्यांचा मुलगा राहुल खुळे तसेच मिराज आळी हे परस्पर भाईंदर पश्चिम येथील शवदाहिनी येथून रिक्षामध्ये दोन गॅस सिलिंडर घेवून जाताना रंगेहाथ मिळून आले. त्यानंतर त्या गॅस सिलिंडर बाबत तपास केला असता, ते सिलिंडर घरी वापरासाठी घेऊन जात असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्या तिघांविरुद्ध पालिकेच्या वतीने कनिष्ठ अभियंता प्रशांत जानकर यांच्या तक्रारीवरून दोन दिवसांपूर्वी भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

पुढारी पु पान नं १-६.

# शिवाजी पार्कवर हवाई हल्ल्याची शक्यता

## प्रजासत्ताक दिनी मुंबई दहशतवाद्यांच्या निशाण्यावर



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

देशाची आर्थिक राजधानी असलेली मायानगरी मुंबई दहशतवाद्यांच्या टार्गेटवर असून प्रजासत्ताक दिनी मुंबईतील शिवाजीपार्क येथे दहशतवादी हवाई हल्ला करण्याच्या तयारीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करुन शिवाजी पार्क परिसर नो फ्लाईंग झोन घोषित केला आहे.

मुंबई पोलिसांच्या अभियान विभागाचे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कायद्याच्या कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याबाबतचे आदेश जारी केले.

या आदेशानुसार, गुरुवारी २६ जानेवारीला शिवाजी पार्क, दादर येथे प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या परेड समारंभावेळी दहशतवादी / समाजविरोधी घटक हवाई मार्गाचा /...६

## शिवाजी पार्कवर हवाई हल्ल्याची शक्यता

**पान I वरून :** वापर करून हल्ला करू शकतात. त्यामुळे मानवी जीवन, आरोग्य, सुरक्षितता आणि सार्वजनिक मालमत्तेला इजा होण्याचा गंभीर धोका निर्माण होऊन सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच, या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहणार असल्याने मुंबईतील सर्व बारीकसारीक हालचालींवर नजर ठेवणे, महत्वाच्या, अतिसंवेदनशील ठिकाणांची तपासणी करणेही आवश्यक असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

हवाई हल्ल्यासाठी अतिरेक्यांकडून ड्रोन, पॅराग्लायडर्स, रिमोट कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्टचा वापर करून हल्ला करण्याची शक्यत आहे. त्यामुळे शिवाजी पार्क पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही उड्डाणक्रियांना प्रतिबंध (नो फ्लाईंग झोनचे) आदेश जारी करण्यात आले आहेत. हे आदेश २५ जानेवारीच्या मध्यरात्रीपासून २६ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत लागू रहाणार आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भादंवि कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

CamScanner

पुढारी पृ पान नं-3.

# लुटलेले ९२ लाख नागरिकांना केले परत

## सायबर गुन्हे शाखेच्या पथकाने भामट्यांचे मनसुबे उधळले

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सायबर गुन्हे शाखेने सायबर गुन्ह्यांमध्ये २०२२ मध्ये फसवणूक झालेल्या पीडितांना गुन्हे उघडकीस आणून जवळपास ९२ लाख रुपये परत मिळवून दिले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत सायबर विषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखेअंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. आयुक्तालयातील फसवणूक झालेल्या नागरिकांच्या ऑनलाईन फसवणूक तक्रारीसंदर्भात अर्ज आलेले असतात. २०२१ मध्ये ७९४ तक्रारी अर्ज व २०२२ मध्ये २७३८ तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्षाला प्राप्त झाले होते.

सायबर गुन्हे कक्षाला सामान्य नागरिकांची ऑनलाईन फसवणुकीची तक्रार मिळताच तात्काळ ज्या बँक / वॉलेट मध्ये रक्कम गेली असेल त्याबाबत सायबर गुन्हे कक्षाचे पोलीस अधिकारी , पोलीस अंमलदार हे तपास करून या रकमेबाबत पत्रव्यवहार व वेळोवेळी पाठपुराव्याच्या आधारे सायबर फसवणूकीच्या अर्ज चौकशी करून त्याचा तपास करतात. याप्रकारे सायबर गुन्हे कक्षाने तपास करून तक्रारदार यांना कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेविना २०२१ मध्ये २८ लाख ८० हजार ९६९ तर २०२२ मध्ये ९१ लाख ९४ हजार ८३३ रुपयांची फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिली आहे. तसेच २०२२ मध्ये २७ गुन्ह्यांमधील आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नोंद असलेले सायबर फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. २०२२ मध्ये सायबर गुन्हे कक्षाकडून आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी सायबर तपासाबाबत २२ प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सायबर गुन्हे फसवणुकीच्या प्रकारांबाबत माहिती देण्यासाठी १२ विविध ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सायबर गुन्हे कक्षाकडून सायबर तक्रारीमध्ये होणाऱ्या नागरिकांच्या फसवणूकीस आळा घालण्यासाठी व सायबर फसवणूकीबाबत जनजागृती करण्यासाठी स्वतंत्र सेल्फी स्टॅण्डची उभारणी करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे सायबर गुन्हे कक्षास आलेल्या तक्रारींमध्ये तक्रारदार हे उच्चशिक्षीत, उच्च पदस्थ, व्यवसायिक डॉक्टर, वकील, बँक अधिकारी व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये काम करणारे असून त्यांची योग्य माहितीच्या अभावामुळे फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

लोकसत्ता पृ पान नं-१.

# ३० जानेवारीला मेट्रो कारशेडच्या हरकतींवर पालिका मुख्यालयात सुनावणी

**भाईंदर :** प्रारूप विकास आराखड्यात मेट्रो कारशेडसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागेविरोधात नोंदवलेल्या हरकतींवर येत्या ३० जानेवारी रोजी सुनावणी होणार आहे. नागरिकांच्या विनंतीवरून ही प्रक्रिया पालिका मुख्यालयातच होणार आहे.

मीरा-भाईंदर मेट्रो मार्गिका ९चे काम गेल्या अडीच वर्षांपासून प्रगतिपथावर आहे. मार्गिकेकरिता आवश्यक असलेल्या कारशेडची जागा भाईंदर पश्चिम येथील राई-मोर्वा गावालगत ८७ एकरांत एमएमआरडीएने निश्चित केली आहे; मात्र स्थानिकांनी तीव्र विरोध केला आहे. शेतजमिनींच्या जागेवर कारशेड केल्यामुळे स्थानिक शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. तसेच मेट्रो मार्गामुळे शेकडो वर्षे जुनी घरे तुटणार आहेत. या मुद्द्यावर ग्रामस्थांनी मेट्रो व कारशेडविरोधात आंदोलन सुरू केले आहे.

ही जमीन एमएमआरडीएने आरक्षित केली असली तरी ती शहराच्या विकास आराखड्यात राखीव ना विकास क्षेत्र व रहिवासी क्षेत्रात येत होती. त्यामुळे विकास आराखड्यातदेखील ही जमीन कारशेडसाठी आरक्षित करण्यासंदर्भात कार्यवाही एमएमआरडीएच्या मागणीनुसार कोकण नगररचना विभागाकडून केली जात आहे. जमीन आरक्षित करण्याच्या आदेशाविरोधात ११७६ हरकती ग्रामस्थांकडून दिलेल्या मुदतीत नोंदवण्यात आल्या होत्या. पुढील आठवड्यात

CamScanner

# तक्रारींचे निवारण करण्यासाठी वेगळी योजना

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात नागरिकांचे तक्रार अर्ज प्राप्त होत असतात. नागरिकांकडून प्राप्त तक्रारीचे लवकरात लवकर निवारण होण्यासाठी व नागरिकांना न्याय मिळण्याकरिता वेगळी उपाय-योजना राबवत दर शनिवारी पहिल्या सत्रात 'तक्रार निवारण दिन साजरा' करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी घेतला आहे. याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या आहेत. आठवड्यातील दर शनिवारी पोलीस ठाणे निहाय पहिल्या सत्रामध्ये नागरिकांचे अर्ज/तक्रारी असतील, तर त्याचे निवारण करण्यात येणार आहे. यामुळे आजवर धूळ खात असलेले अथवा दुर्लक्ष्य करण्यात आलेल्या सर्व अर्जांचे निवारण होणार आहे. पोलीस आयुक्ताच्या निर्णयाला नागरिकां कडून चांगला प्रतिसाद मिळणार आहे.

CS CamScanner

MHT
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
गणतंत्र दिवस की शुभकमनाएं
# मुंबई हिंदमाता टाइम्स
मुंबई, गुरुवार 26 जनवरी 2023
RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, माघ शुक्ल पक्ष पंचमी | 07.14 am / 06.28 pm | | अधिकतम 28°C / न्यूनतम 22°C | NSE / BSE | |

# आसान हुई विदेश जाने की राह
## एक साल में 75 हजार लोगों ने बनवाए पासपोर्ट

संवाददाता MHT
राकेश सिंह

नालासोपारा। बदलते समय के अनुसार विदेश यात्रा करना बहुत आसान हो गया है और देश के कई नागरिक अब घूमने के लिए भी विदेश जाने लगे हैं। विदेश यात्रा के लिए पासपोर्ट एक महत्वपूर्ण दस्तावेज है। वीजा हासिल करने के लिए पासपोर्ट बेहद जरूरी है। अगर आपके पास पासपोर्ट नहीं है, तो आपको वीजा भी नहीं मिल सकता है। पासपोर्ट कुछ शर्तों के तहत आपके देश से विदेश जाने के लिए सरकार द्वारा दी गई एक औपचारिक अनुमति है।

**अब 15 दिनों में मिलता है पासपोर्ट**

### कितने लोगों ने लिया पासपोर्ट- कितना होता है खर्च

मीरा-भायंदर-वसई-विरार पुलिस कमिश्नरेट के तहत 2022 में 74 हजार 857 नागरिकों ने पासपोर्ट के लिए आवेदन किया था। इनमें से 74 हजार 856 नागरिकों को कानूनी प्रक्रिया के बाद पासपोर्ट दिया जा चुका है। जबति एक आवेदन रुका हुआ है। नया पासपोर्ट बनने में 45 दिन और तत्काल पासपोर्ट के लिए 7 दिन लगते हैं। इस पर 1500 रुपए तक खर्च होता है। अगर उम्र 60 से ज्यादा हैं तो 1350 रुपये खर्च होते हैं। तत्काल पासपोर्ट की कीमत 2 हजार से 4 हजार रुपये होती है।

### यह कागजात हैं जरुरी

जन्म प्रमाण पत्र, छोड़ने का प्रमाण पत्र, निवासी प्रमाण पत्र, स्वयं पहचान पत्र, पैन कार्ड, मतदाता पहचान पत्र जैसे दस्तावेजों की मूल प्रति और जेरोक्स कॉपी की आवश्यकता होती है। यदि कोई आवश्यक दस्तावेज नहीं है, तो एक आवश्यक हलफनामा आवश्यक है। इसके मुताबिक जरूरी दस्तावेज पूरे करके पासपोर्ट सेवा केंद्र जाना होगा। पुलिस कमिश्नरेट के 6 शहर के डाकघरों में पासपोर्ट सेवा अभी उपलब्ध नहीं है। जैसा कि नागरिकों को ऑनलाइन आवेदन करने के बाद पासपोर्ट कार्यालय जाना पड़ता है, उन्हें परेशानी उठानी पड़ती है।



> "जब कोई नागरिक पासपोर्ट के लिए आवेदन करता है, तो उसके दस्तावेजों को सत्यापित किया जाता है। यह भी पूछताछ और पुलिस में जांच की जाती है कि क्या उसके खिलाफ स्थानीय पुलिस स्टेशन में कोई अपराध दर्ज है या नहीं।
>
> – कार्यालय प्रमुख, (पासपोर्ट विभाग)

# भाईंदरमध्ये ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई

मिरा-भाईंदर : ऑर्केस्ट्रा बारमध्ये पुरुष ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी तरुणी अश्लील नृत्य करत असल्याने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने भाईंदरमध्ये कारवाई केली. याप्रकरणी हॉटेलचे कर्मचारी व ग्राहक अशा एकूण ११ जणांवर नवघर पोलिस ठाण्यात विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

भाईंदर पूर्वेच्या घोडदेव रोडवरील एका ऑर्केस्ट्रा बारमध्ये पुरुष ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी तरुणी अश्लील नृत्य करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला गुप्त बातमीदारांमार्फत मिळाली होती. याआधारे पोलिसांच्या पथकाने बोगस ग्राहकाला बारमध्ये पाठवून छापा घातला.

CamScanner

सकाळ

# सायबर गुन्हे तिपटीने वाढले

## मेरा-भाईंदर, वसई-विरारमध्ये सुशिक्षित नागरिक लक्ष्य



भाईंदर, ता. २५ (बातमीदार) मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस ायुक्तालयांतर्गत सायबर गुन्ह्यांमध्ये ल्या वर्षभरात तिपटीने वाढ झाली ाहे. विशेष म्हणजे गुन्हेगारांकडून ्रशिक्षित, उच्च पदस्थ व्यक्तींनाच ःक्ष्य केले जात आहे. पोलिसांनीही ायबर गुन्हेगारांवर कारवाई ःरण्यासाठी कंबर कसली आहे.

तंत्रज्ञान जसजसे आधुनिक होत ाहे, तसतसे सायबर गुन्ह्यांमध्येही ाढ होऊ लागली आहे. गुन्हेगारांकडून ार्वसामान्यांची ऑनलाईन फसवणूक ःरण्याच्या वेगवेगळ्या पद्धती ग्वलंबल्या जात आहेत. यात २०२१ ध्ये पोलिस आयुक्तालयातील ाविध पोलिस ठाण्यात ऑनलाईन ःसवणुकीचे ७९४ दाखल झाले होते. २०२२ मध्ये यात मोठी वाढ होऊन तब्बल २७३८ गुन्हे दाखल झाले आहेत. यात डेबिट कार्ड अथवा क्रेडिट कार्डद्वारे फसवणूक, क्यूआर कोड स्कॅनिंग, लॉटरी, ऑनलाईन नोकरी, क्रिप्टो करन्सी, वीजबिल अपडेट, समाजमाध्यमांद्वारे सेक्स्टॉर्शन, बँक खाते केवायसी अपडेट, गुगलवर ग्राहक तक्रार निवारण केंद्राचे बनावट क्रमांक अशा नाना शक्कल लढवून लोकांची ऑनलाईन फसवणूक करण्याच्या प्रकारांचा समावेश आहे.

बहुतांश गुन्हे अन्य राज्यांत बसून केले जात असतात. त्यामुळे अशा गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून तक्रारदारांचा मुद्देमाल परत मिळवणे, हे पोलिसांपुढे एक आव्हान ठरत आहेत. पण पोलिसांच्या सायबर गुन्हे विभागाने २०२१ मध्ये ऑनलाईन फसवणुकीच्या गुन्ह्यातील २८ लाख ८० हजार ९६९ एवढी रक्कम तक्रादारांना परत मिळवून दिली; तर २०२२ मध्ये गुन्ह्यांची उकल करण्यातही लक्षणीय वाढ होऊन या विभागाने ९१ लाख ९४ हजार ८३३ रुपयांची रक्कम तक्रारदारांना परत केली आहे.

### 'गोल्डन अवर'ला महत्त्व

सायबर गुन्ह्यांमध्ये 'गोल्डन अवर'ला फार महत्त्व आहे. म्हणजेच गुन्हा घडल्यानंतर त्याची माहिती तत्काळ सायबर सेलला दिली; तर तक्रारदार व्यक्तीची रक्कम ज्या वॉलेट अथवा बँक खात्यात गेली असेल त्या ठिकाणी संपर्क करून ती तत्काळ थांबवून परत मिळवणे शक्य होते. त्यामुळे नागरिकांनी शक्य तितक्या लवकर नजीकच्या पोलिस ठाण्यात, सायबर विभागाकडे तक्रार दाखल करावी; तसेच www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर किंवा १९३० या हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

Mumbai, Palghar-Today
26/01/2023 Page No. 1

CS CamScanner

दैनिक
R.N.I.NO MA. 25
# मुंबई केसरी टाइम्स
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई.
www.mumbaikesaritimes.com
वर्ष : १५ अंक : 229 गुरुवार २६ जनवरी 2023 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 08

## पेल्हार पुलिस के चंगुल में आए ३ शातिर चोर ,माल जप्त

**वसई** ; पेल्हार पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम को एक बड़ी सफलता मिली है.दरअसल टीम ३ शातिर चोरो को गिरफ्तार किया है.इनके पास से ५ लाख से अधिक माल जप्त कर व ३ अपराधों की गुत्थी सुलझाई है। यह जानकारी पुलिस ने बुधवार को दी है।यह कार्रवाई परिमंडल ३ डीसीपी सुहास बावचे व एसीपी रामचंद्र देशमुख के मार्गदर्शन में पेल्हार थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक वसंत लब्दे,पी.आई महेंद्र शेलार,(क्राइम) के नेतृत्व में डिटेक्शन ब्रांच के पो.उप.नि.सनिल पाटील की टीम ने की है।पुलिस के मुताबिक,५ से ७ जनवरी के बीच वसई पूर्व निवासी- शिकायतकर्ता मामुन हारुन पियार्जी की अज्ञात चोर ने आर.जी बाइक प्वाइंट नामक दुकान के शटर का ताला तोड़कर दुकान से विभिन्न कंपनियों के मोटरसाइकिल के पुर्जे, डीवीआर, टीवी, उपकरण ले गए, कुलमिलाकर २,९०,००० रुपये का माल की चोरी की थी.इस मामले में शिकायतकर्ता ने पेल्हार थाने में केस दर्ज करवाया था।पुलिस ने बताया है कि उक्त अपराध के संबंध में वरिष्ठ अधिकारियों के मार्गदर्शन में डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारियों ने अपराध स्थल का भ्रमण किया तथा तकनीकी जानकारी एवं मुखबिरों के माध्यम से प्राप्त सूचना के आधार पर कार्रवाई की,जिसमे आरोपी राजेश कदम ऊर्फ घोचु,अजयन पाऊर विडू ऊर्फ पी.व्ही.और हरिंद्र गुप्ता को हिरासत में लिया।जांच के दौरान, उन्होंने कहा कि उपरोक्त अपराध किया है और उन्हें उक्त अपराध के लिए गिरफ्तार किया गया,इनके पास से विभिन्न कंपनियों के मोटर साइकिल के पुर्जे,स्टील,टी.वी. एक ऑटो रिक्शा के साथ-साथ टाटा एस कन्नी टेम्पो,मोटर साइकिल,कटर, पेचकश व पाना अपराध करने में आरोपी द्वारा इस्तेमाल किया गया,कुलमिलाकर ०५,९६,९०० रुपये का माल जप्त किया गया है।३ अपराधों का खुलासा हुआ है।पुलिस अधिकारी ने कहा कि आरोपी राजेश कदम उर्फ ??घोचू के खिलाफ मुंबई,पालघर,रत्नागिरी,रायगढ़ जिलों के अलग-अलग थानों में कुल १६ मामले दर्ज हैं,आरोपी अजयन पाऊर विडू ऊर्फ पी.व्ही उसके खिलाफ तुलिंज, वकोला मुंबई थानों में विभिन्न धाराओं के तहत ०३ मामले दर्ज हैं।




CamScanner

# पोलिसांनी परत दिली घरफोडीतील कोट्यवधी रुपयांची मालमत्ता

भाईंदर : मीरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने मीरा-भाईंदर शहरातील घरफोडी, चोरी अशा गुन्ह्यात हस्तगत केलेला १ कोटी ७ लाख ५१ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल फिर्यादींना परत दिला आहे. त्यात सोन्याचे दागिने, गाडी, मोटरसायकल, मोबाइल आदी वस्तूंचा समावेश आहे. मीरा, भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाने मीरा-भाईंदर शहरात गेल्या वर्षी झालेल्या घरफोडी, चोरी अशा गुन्हयांची कौशल्यपूर्वक उकल करुन चोरी झालेला मुद्देमाल जप्त केला होता. त्यात ३ चारचाकी वाहने, ३ ऑटोरिक्षा, ८ मोटारसायकली, १५ मोबाईल हॅन्डसेट, सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश होता. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पोलिसांनी कार्यक्रम आयोजन करून त्यात फिर्यादी व पीडित यांना त्यांच्या वस्तू परत दिल्या. कार्यक्रमाला पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय, पोलीस उपायुक्त जयंत बजबळे व इतर पोलीस अधिकारी, अंमलदार व नागरिक उपस्थित होते.

CamScanner